## नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १९१/२०१६ मधील नि. २१ वरील आदेश.

१. प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. ८ ने प्रतिहरकत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन मिळणेकामी दाखल केला आहे.

२. सदरचे अर्जास पुनर्वादींनी सदरच्या विलंबाचे कारण दिवसागणीक स्पष्ट न केल्याची हरकत नोंदविली आहे.

३. उत्तरवादी क्र. ८ तर्फे विधीज्ञ श्री. आंबिये यांचा तर पुनर्वादींतर्फे विधीज्ञ श्री. लोट यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादी क्र. ८ ने त्यांच्या विधिज्ञांस निकालाची प्रत उशीरा दिल्यामुळे प्रतिहरकत वेळेत नोंदविता आली नाही, असा दावा उत्तरवादी क्र. ८ ने केला आहे. प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादी क्र. ८ ने ***महाराष्ट्र सरकार वि. काळू लडकू म्हात्रे २०११ (६) ऑलएमआर २४२*** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. सदर न्यायनिर्णयात सन्माननीय उच्च न्यायालयाने प्रतिहरकत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबद्दल कारण दाखवण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष नोंदविला असून पुनर्वाद न्यायालयाने त्या बाबतीत उदार दृष्टीकोन स्विकारला पाहिजे असा निष्कर्ष नोंदविला आहे. सदरचे न्यायतत्व प्रस्तुत प्रकरणात लागू असल्यामुळे विलंब माफ करुन उत्तरवादी क्र. ८ ची प्रतिहरकत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे.

५. तथपि, पुनर्वादींना झालेल्या गैरसोयीबद्दल उत्तरवादी क्र. ८ ने रुपये ९०/– खर्च देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब आदेश.

### आदेश

१. उत्तरवादी क्र. ८ ची प्रतिहरकत उत्तरवादी क्र. ८ ने पुनर्वादी क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी रक्कम रु. ३०/– खर्च दिल्यानंतर अथवा न्यायालयात रक्कम रुपये ९०/– खर्चापोटी जमा केल्यानंतर अभिलेखावर घेण्यात यावी.

२. येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली करणेत येत आहे.

३. पुढील तारीख ०८/०४/२०२२ रोजी नेमणेत येत आहे.

(शि. व. हांडे)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,

दिनांकः– ०९/०३/२०२२

सिंधुदुर्ग–ओरोस.